

# ॲनिमेशनपटांचा टीव्हीवर वर्ल्ड प्रिमिअर

हिंदी सिने सृष्टीत आता ॲनिमेशनपटांची चलती सुरु झाली असली तरी आपल्याकडे मात्र पाश्चात्य देशांप्रमाणे सुपरमॅन, बॅटमॅन, स्पायडरमॅन सारखे काल्पनिक सुपरहिरो तयार करण्याची गरज लागणार नाही. कारण हिंदू संस्कृती इतकी प्रगल्भ आहे की आपल्याकडे रिअल सुपरहिरो आहेत, ज्यांच्या सुपर पॉवरचे अनेक दाखले इतिहासातजमा आहेत, उदा. कृष्ण, हनुमान. पौराणिक आणि ऐतिहासिक या रिअल सुपरहिरोंच्या साहस कथांना काल्पनिकतेची जोड देत जिप्सी ऑडिओ व्हिडीओने ॲनिमेशनच्या नवीन स्वरूपात सादर करण्याचं ठरवलं आहे. यातील पहिलं पर्व २३ मार्चपासून प्रत्येक रविवारी स्टार गोल्ड वाहिनीवर दाखल झालं आहे.

या पहिल्या पर्वातला पहिला ॲनिमेशन पट तो घटत्कोचाचं. ८० मिनिटांच्या या ॲनिमेशनपटात महाभारतासारख्या महाकाव्यावर इतिहास बनवणाऱ्या एका छोट्या घटत्कोचाची कथा आहे. घटत्कोचाच्या अंगाने जाणारी ही कथा लहान मुलांचं तर मनोरंजन करेलच, परंतु मोठ्यांनाही आपल्याकडे आकर्षित करेल. घटत्कोच हा पांडव भीम आणि हिडींबा राक्षसिणीचा मुलगा आहे. जन्मापासूनच भेकड असलेल्या घटत्कोचाला नेहमी मित्रांकडून छळलं जायचं. त्यामुळे हिडींबा त्याचं मनोधैर्य वाढवण्यासाठी त्याला त्याच्या आजोबांकडे पाठवते. आजोबा त्याला राक्षसी शक्तीचं शिक्षण देतात. जंगो जिंगालच्या मदतीने घटत्कोचाला सुपरनॅचरल पॉवर प्राप्त होते आणि वेळ येते त्या अवघड प्रसंगाची... ज्यात कौरव आणि पांडवांच्या युद्धात घटत्कोचाला वडिलांकडून लढायचं असतं. घटत्कोच आपल्या वडिलांच्या बाजूने लढतो. ही आहे महाभारतातील एका लढवैया पुत्राची कथा.

विष्णूचा निस्सीम भक्त समजला जाणारा प्रल्हाद ॲनिमेशन व्यक्तिरेखेतून लहान मुलांना आणि मोठ्यांना आकर्षित करण्याकरता याच 'जिप्सी ऑडियो व्हिडिओ'च्या येत आहे. प्रल्हाद हा दुष्टांचा देव असणाऱ्या हिरण्यकश्यपूच्या पोटी जन्माला येवूनही विष्णूचा मोठा भक्त असतो. त्याची ही साहसकथा ॲनिमेशन रुपात पाहणं हा एक वेगळा अनुभव ठरेल. हिरण्यकश्यपू सर्व शक्तीशाली होण्याकरता ब्रह्माला प्रसन्न करतो आणि देवावर आपले अधिराज्य गाजवतो. त्याच्या या जाचाला कंटाळत देवदेवतांच्या सुरक्षेसाठी आणि अत्याचाराचा नायनाट करण्यासाठी विष्णू नरसिंहाचा अवतार घेऊन हिरण्यकश्यपूचा वध करतात का, हे या सिनेमांत ३० मार्चला बघायला मिळणार आहे.

याबाबत जिप्सीचे अमित छेडा सांगतात की, ॲनिमेशन चित्रपटांचा मोठा प्रेक्षकवर्ग हा बच्चे कंपनी आहे आणि आता सिनेमागृहांमध्ये जाऊन पाहणं पूर्वीइतकं सोपं नसल्याने आम्ही टीव्हीच्या माध्यमातून सरळ बच्चे कंपनीकडेच जाण्याचा प्रयत्न केला आहे. अशा सिनेमांचा वर्ल्ड प्रिमिअर दाखवण्यासाठी स्टार गोल्ड वाहिनी आम्हाला प्रोत्साहन देतेय ते आमचं भाग्य आहे. मुलांच्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या पाहता नक्कीच आमच्या या नव्या संकल्पनेला प्रतिसाद मिळेल...

विविध प्रसारमाध्यमांतून सतत वेगवेगळ्या मालिकांच्या, जाहिरातींच्या माध्यमातून आपल्या समोर अनेक आवाज येत असतात. आपल्या भाषेसोबत डब सिनेमांमधून परदेशी भाषेतही हे आवाज आपल्या कानावर येत असतात. प्राण्यांचे, पक्षांचे कार्टून कॅरेक्टरचे हे आवाज नेहमीच आपल्याला भुरळ पाडत असतात. पण हा आवाज नेहमीच पडद्यामागेच राहतो. कशी असते ही

व्यवसाय म्हणून या क्षेत्राची निवड करता येईल का?... अशा अनेक प्रश्नांची उत्तरं आपल्याला 'दिलखुलास' या चर्चात्मक कार्यक्रमातून 'मी मराठी' या

आपल्या आसपासच्या समस्यांवर